RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ६, अंक १४] बुधवार, मार्च १८, २०२०/फाल्गुन २८, शके १९४१ [पृष्ठे ५, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक २१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३.—** महाराष्ट्र परिचारिका अधिनियम, १९६६ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. . . . . पृष्ठे १-५

दिनांक १७ मार्च २०२० रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**राजेन्द्र ग. भागवत,**
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३.**

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर, "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १८ मार्च २०२० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र परिचारिका अधिनियम, १९६६ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम**

१९६६ चा महा. ४०. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र परिचारिका अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र परिचारिका (सुधारणा) अधिनियम, २०२०, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ३ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र परिचारिका अधिनियम, १९६६ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३ च्या पोट-कलम (३) मध्ये,— १९६६ चा महा. ४०.

(क) खंड (अ) मध्ये,—

(एक) उप-खंड (एक) ऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :—

" (एक) आरोग्य सेवा सहायक संचालक, (शुश्रूषा) ;";

(दोन) उप-खंड (तीन) नंतर, पुढील उप-खंड जादा दाखल करण्यात येईल :—

" (चार) अधीक्षक, शुश्रूषासेवा, बृहन्मुंबई महानगरपालिका ;";

(ख) खंड (ब) मध्ये,—

(एक) उप-खंड (एक) मधील, " द्यावयाचा एक सदस्य " या मजकुराऐवजी, " द्यावयाचे दोन सदस्य " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) उप-खंड (चार) मधील, " तीन प्रदेशांपैकी प्रत्येक प्रदेशातून " हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारासह वगळण्यात येईल ;

(तीन) उप-खंड (पाच), (सहा), (सात) आणि (आठ) ऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :—

" (पाच) भारतीय प्रशिक्षित परिचारिका संघाच्या राज्य शाखेने निवडून द्यावयाचा एक सदस्य ; " ;

(ग) खंड (क) ऐवजी, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (क) नामनिर्देशित सदस्य,—

राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे पाच सदस्य, त्यापैकी,—

(एक) नोंदणीकृत परिचारिकांमधून नामनिर्देशित करावयाचा एक सदस्य,

(दोन) भिषकांमधून नामनिर्देशित करावयाचा एक सदस्य,

(तीन) शल्यचिकित्सकांमधून नामनिर्देशित करावयाचा एक सदस्य,

जे संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन याच्या अधिपत्याखालील सेवेत कार्यरत आहेत ;

(चार) सार्वजनिक आरोग्य परिचारिकांमधून नामनिर्देशित करावयाचा एक सदस्य ;

(पाच) राज्याच्या मान्यताप्राप्त परिचारिका संस्थेमधील परिसेविका पाठनिर्देशक किंवा चिकित्सालयीन निदेशक यांच्यामधून नामनिर्देशित करावयाचा एक सदस्य.".

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ४ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४ मध्ये, पोट-कलम (२) मधील, दुसरे परंतुक वगळण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ७ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मध्ये, पोट-कलम (१) मधील,—

(क) खंड (क) मध्ये " दाखल करण्यात आलेले नसेल ;" या मजकुरानंतरचा, " किंवा " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ख) खंड (ड) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :—

" (इ) ज्या प्रवर्गातून त्याला निवडून दिले होते त्या प्रवर्गाची पात्रता धारण करण्याचे त्याने बंद केले असेल ; किंवा

(फ) जर तो किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्य, कोणत्याही स्वरूपात, कोणत्याही शुश्रूषा आस्थापनेचा मालक किंवा भागीदार असेल.".

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १७ मध्ये,— सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम १७ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (२) मधील, " पाच " या मजकुराऐवजी, " तीन " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (५) च्या खंड (ब) मध्ये,—

(एक) " दोन रुपये " या मजकुराऐवजी, " पाचशे रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) परंतुकामध्ये, " पाच रुपये " या मजकुराऐवजी, " दोन हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (७) मध्ये, " दोन रुपये " या मजकुराऐवजी, " पाचशे रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम १८ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० यामध्ये नवीन कलम १८अ समाविष्ट करणे.

**" १८अ.** (१) महाराष्ट्र राज्य वगळता इतर राज्यात परिचारिका म्हणून नोंदणी करण्याकरिता अर्हताप्राप्त केलेल्या ज्या व्यक्तीची या अधिनियमाअन्वये पारस्परिक नोंदणी प्राप्त करण्याची इच्छा असेल अशी कोणतीही व्यक्ती प्रबंधकाकडे विहित नमुन्यात अर्ज करील आणि त्यासोबत, विहित करण्यात येईल अशी फी देईल. असा अर्ज व फी प्राप्त झाल्यावर, प्रबंधक, नोंदणी पुस्तकात त्या अर्जदाराची पारस्परिक नावनोंदणी करण्यासाठी परिषदेच्या अध्यक्षाची मान्यता घेईल. पारस्परिक नोंदणी.

(२) पोट-कलम (१) अन्वये जिचे नाव नोंदणी पुस्तकात दाखल केले असेल, अशा प्रत्येक व्यक्तीस विहित करण्यात येईल अशा नमुन्यात एक पारस्परिक नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येईल. असे प्रमाणपत्र, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीसाठी अंमलात राहील.

(३) पोट-कलम (१) अन्वये पारस्परिक नोंदणी धारण करणारी कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाअन्वये घेण्यात येणाऱ्या कोणत्याही निवडणुकीत उमेदवार म्हणून उभा राहण्यास किंवा मत देण्यास पात्र ठरणार नाही.".

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम १९ मधील पोट-कलम (४) मध्ये, " पाच रुपये " या मजकुराऐवजी, " पाचशे रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम १९ ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम २७ मध्ये,— सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम २७ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (९) मध्ये,—

(एक) " दोनशे पन्नास रुपये " या मजकुराऐवजी, " पाच हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " सहा महिने " या मजकुराऐवजी, " एक वर्ष " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) " पाचशे रुपये " या मजकुराऐवजी, " दहा हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (१०) मध्ये,—

(एक) " पन्नास रुपये " या मजकुराऐवजी, " दोन हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " तीन महिने " या मजकुराऐवजी, " सहा महिने " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) " शंभर रुपये " या मजकुराऐवजी, " पाच हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (११) मध्ये,—

(एक) " दोनशे पन्नास रुपये " या मजकुराऐवजी, " पाच हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " सहा महिने " या मजकुराऐवजी, " एक वर्ष " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) " एक हजार रुपये " या मजकुराऐवजी, " दहा हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम २८ ची सुधारणा.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम २८ मधील, पोट-कलम (२) मध्ये,—

(क) " शंभर रुपये " या मजकुराऐवजी, " एक हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) " दोनशे रुपये " या मजकुराऐवजी, " दोन हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) " तीनशे रुपये " या मजकुराऐवजी, " पाच हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ३१ ची सुधारणा.

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३१ मध्ये,—

(क) पोट-कलम (३) मध्ये,—

(एक) " पंचवीस रुपये " या मजकुराऐवजी, " एक हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " पन्नास रुपये " या मजकुराऐवजी, " तीन हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) " शंभर रुपये " या मजकुराऐवजी, " पाच हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (४) मध्ये,—

(एक) " शंभर रुपये " या मजकुराऐवजी, " एक हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " दोनशे रुपये " या मजकुराऐवजी, " दोन हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) " तीनशे रुपये " या मजकुराऐवजी, " पाच हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ३३ ची सुधारणा.

**११.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३३ मधील,—

(अ) खंड (१) मध्ये, " दोनशे पन्नास रुपयापर्यंतच्या " या मजकुराऐवजी, " पाच हजार रुपयापर्यंतच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) खंड (२) मध्ये,—

(एक) " सहा महिने " या मजकुराऐवजी, " एक वर्ष " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " पाचशे रुपये " या मजकुराऐवजी, " दहा हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**१२.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३४ मधील,— सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ३४ ची सुधारणा.

(क) खंड (अ) मध्ये, " शंभर रुपये " या मजकुराऐवजी, " पाच हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) खंड (ब) मध्ये,—

(एक) " तीन महिने " या मजकुराऐवजी, " सहा महिने " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " दोनशे रुपये " या मजकुराऐवजी, " दहा हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**१३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३८ मधील पोट-कलम (२) मध्ये,— सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ३८ ची सुधारणा.

(क) खंड (ज) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (ज-१) कलम १८क अन्वये, पारस्परिक नोंदणीसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना, त्यासाठीची फी आणि पारस्परिक नोंदणी प्रमाणपत्राचा नमुना ;" ;

(ख) खंड (के) मध्ये, " दोन रुपयांची " या मजकुराऐवजी, " एक हजार रुपयांची " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.